राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह,ह्रदयरोग,व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना आदिवासी योजना (TSP) अंतर्गतराष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर सेंटर,नागपूर येथे टर्शरी केअर कॅंन्सर सेंटर उभारण्यासाठी केंद्र हिश्श्यापोटी रु.१४३.२४ लक्ष इतक्या निधी वितरणास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः टिसीसी २०१७/ प्रक्र-१८७/आरोग्य ३(अ)
गो.ते.सकुल इमारत, १० वा मजला, ए विंग
मंत्रालय, एल.टी.मार्ग मुंबई-४०० ००१.
दिनांक: १२ जानेवारी, २०१८.

संदर्भ:-

१) आरोग्य व कुटंब कल्याण मंत्रालय,भारत सरकार यांचे क्रमांक-T-२००१५/२/ २०१४-CR (NCD-II SECTION)(General) दि.१३ जानेवारी,२०१७.
२) आयुक्त,आरोग्य सेवा व अभियांन संचालक (राआअ) यांचे क्र.संआसे NCD/ आदिवासी योजना (TSP) / ११९-२०/ दि.२४.४.२०१७ चे पत्र.
३) सह संचालक,(असंसर्गजन्य रोग) आरोग्य सेवा,मुंबई यांचे क्र. क्र.संआसे NCD/ आदिवासी टिसीसी तरतुद/१५१-१५३/१७ दि.२८.४.२०१७ चे पत्र
४) संचालक,वित्त व लेखा राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/ एफएमजी/ Revail/३१७७२-७७८/२०१६-१७ दि.१२.७.२०१७ चे पत्र.
५) शासन निर्णय क्रमांक- बीयुडी-२०१७/ प्रक्र-०५/ कार्यासन-६, आदिवासी विकास विभाग, दिनांक २८.१२.२०१७.

प्रस्तावना:-

" राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह,ह्रदयरोग,व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा) " या योजनेंतर्गत,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कॅन्सर केअर सेंटर, नागपूर येथे टर्शरी केअर कॅंसर सेंटर (TCCC) स्थापन करण्याकरिता आदिवासी योजना (TSP) या उद्दिष्टांसाठी केंद्र शासनाने संदर्भाधीन दि.१३.१.२०१७ च्या आदेशान्वये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. केंद्र शासनाच्या " राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अभियान सुकाणू गटाच्या" दि.२३ ऑक्टोबर,२०१२ रोजी झालेल्या ९ व्या सभेतील विषय क्र.१० अन्वये अखर्चित निधी पुनर्जिवित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे केंद्राने राज्यास दिलेला निधी आर्थिक वर्ष संपल्यानंतर व्यपगत होत नसून, सदर अखर्चित निधी राज्य शासन पुढील आर्थिक वर्षात तो ज्या उद्दिष्टासाठी देण्यात आला आहे त्यावर खर्च करु शकतात असे केंद्र शासनाच्या वित्तीय व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक सूचना क्र.३.३.१ नमूद केले आहे. केंद्र शासनाच्या अनुदान वितरणाच्या तरतुदीस तसेच संदर्भाधीन प्रस्तावांना अनुसरुन केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरिता राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह,ह्रदयरोग,व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा) " या योजनेंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कॅन्सर केअर सेंटर, नागपूर येथे टर्शरी केअर कॅंसर सेंटर (TCCC) स्थापन करण्याकरिता आदिवासी योजना (TSP) अंतर्गत केंद्र

शासनाने संदर्भाधीन दि.१३.१.२०१७ च्या आदेशान्वये मंजूर केलेले रु.१४३.२४ लक्ष (रु.एक कोटी त्रेचाळीस लाख चोवीस हजार फक्त) इतके अनुदान खालील अटींच्या अधीन वितरीत करण्यास या शासननिर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

१) केंद्र शासनाच्या दि.१३.१.२०१७ च्या आदेशाच्या परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वितरीत करण्यात यावा.

२) सदर निधी आदिवासी घटकांच्या लाभार्थ्यांकरिताच खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी.

सदर निधी राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कँसर हॉस्पीटल अँड रिसर्च सेंटर,तुकडोजी चौक, मानेवाडा रोड,नागपूर-४४० ०२७ यांना अदा करण्यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थसंकल्प व प्रशासन), पुणे यांच्याकडे वितरीत करण्यात येईल.

सदर अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रकमेचे देयक त्यांनी कोषागारात सादर करुन विहीत केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम संबंधित कार्यक्रम अधिका-यांकडे सुपुर्द करावी.

प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासन/राज्यशासन व राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कँसर हॉस्पीटल अँड रिसर्च सेंटर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्र आर-१,२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय मधुमेह कर्करोग व हृदयरोग व पक्षाघात प्रतिबंध नियंत्रण कार्यक्रम ,आदिवासी योजना (TSP) (२२१० एफ ८५४) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३६९/२०१७ दि.२१.९.२०१७ अन्वये प्राप्त सहमतीस तसेच आदिवासी विकास विभागाच्या क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र.५ /कार्यासन ६ दि.२८.१२.२०१७ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्रमांक २०१८०११२१५२४२२२७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.01.12 17:45:58 +05'30'

(रा . शा. कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
२. मा.मंत्री (साआवकुक) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
३. मा.राज्यमंत्री (साआवकुक) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
४. मा.विरोधी पक्षनेता/विधानसभा/विधान परिषद,विधानभवन,मुंबई
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२(लेखा अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) मुंबई/ नागपूर.

६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी , मुंबई.
८. आयुक्त (कु.क.) तथा संचालक, रा. आ. अ., आरोग्य भवन, मुंबई.
९. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१०. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
११. सहसंचालक (असंक), आरोग्य सेवा, आरेग्य सेवा संचालनालय, मुंबई
१२. उप संचालक,आरोग्य सेवा मंडळ, नागपूर
१३. वित्त विभाग (व्यय -१३ / अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई
१४. आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६) मंत्रालय,मुंबई
१५. संचालक,राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कँसर हॉस्पिटल व रिसर्च सेंटर,तुकडोजी चौक, मानेवाडा रोड,नागपूर-४४००२७
१६. सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प/ लेखा), मंत्रालय, मुंबई.
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
१८. निवडनस्ती, आ-३ अ